**जनसंपर्क अधिकारी**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३६३ - २३** **दिनांक : - १८/१०/२०२३**

## सराईत गुन्हेगारास खंडणीच्या गुन्ह्यात अटक

आचोळे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील फिर्यादी नामे चंद्रशेखर पंचदेव विश्वकर्मा वय ४५ वर्षे, शिक्षण- बी.ए., व्यवसाय- शिक्षक, रा. रुम नं.१२, त्रिदेव कॉ.हॉ.सोसायटी राजनगर,नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर यांनी आरोपीत नामे अजय सियानंद बिडलान वय ३३ वर्ष, व्यवसाय- मजुरी, रुम नं. बी/४०३, रिलायबल रेजेंसी, नवनीत हॉस्पीटल जवळ, आचोळे रोड, नालासोपारा पूर्व, ता.वसई, जि.पालघर, मुळ राहणार ग्राम जेपुर, तहसिल-सफिदोर, जि.जिंद, राज्य-हरीयाणा हे फिर्यादी चालवित असलेल्या शाळेमध्ये माहीती अधिकाराखाली माहीती मागवीतात यावेळी आरोपीत हे फिर्यादी चालवित असलेल्या असलेल्या शाळेत माहिती अधिकाराचा अर्ज घेवुन जावुन जर ज्या अर्जातील माहीती आरोपीत यांना देयाची नसेल त्याबदल्यात आरोपीताने २५,०००/- रुपयाची खंडणी मागुन त्यापैकी १०,०००/- रुपये रोख स्वरुपात स्विकारुन प्रत्येक महीण्याला ५०००/- रुपये द्यावे असे सांगितले परंतु फिर्यादी यांनी त्यास नकार दिल्याने आरोपीताने दमदाटी केली म्हणुन केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आचोळे पोलीस ठाण्यात गु.रं.नं. ४९२/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८४,५०६ प्रमाणे दिनांक १६/१०/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाबाबत मा.वरीष्ठांनी गंभीर दखल घेवुन आरोपीत यास अटक करणेकामी सुचना देण्यात आल्या होत्या.त्या अनुशंगाने यातील आरोपीत नामे अजय सियानंद बिडलान वय ३३ वर्ष, व्यवसाय- मजुरी, रुम नं. बी/४०३, रिलायबल रेजेंसी, नवनीत हॉस्पीटल जवळ, आचोळे रोड, नालासोपारा पूर्व, ता.वसई, जि.पालघर, मुळ राहणार ग्राम जेपुर, तहसिल-सफिदोर, जि.जिंद, राज्य-हरीयाणा यास सदर गुन्हात तात्काळ अटक करण्यात आली.

सदर आरोपीत याचेकडे तपास केला असता नमुद गुन्ह्यातील आरोपीत याने वसई तालुक्यातील शैक्षणिक संस्थेमध्ये माहिती अधिकार कायद्यान्वये माहिती अधिकाराचा अर्ज करुन सदर अर्जाचा गैरवापर करुन अर्जातील माहितीची संदर्भाने शैक्षणिक संस्थेमधिल संचालक, प्राचार्य यांना भिती घालुन खंडणी स्वरुपात रक्कम मागणी केली आहे. तसेच काही शैक्षणिक संस्थेमधिल संचालक, प्राचार्य यांचेकडुन खंडणी उकळलेली आहे.

यापुर्वी सदर आरोपीत याचेवर नालासोपारा पोलीस ठाणे येथे २, तुळींज पोलीस ठाणे येथे १ व आचोळे पोलीस ठाणे येथे १ असे एकुण ४ गुन्हे दाखल आहेत.

**आचोळे पोलीस ठाण्यामार्फत आवाहन करण्यात येते कि, अशाच प्रकारे किंवा अन्य प्रकारे अटकेतील सराईत गुन्हेगार व त्याचे साथीदारने काही गुन्हे/घटना केल्या असल्यास न घाबरता पोलीस ठाण्यात संपर्क करुन पोलीसांना सहकार्य करावे.**

सदरची कामगिरी हि मा. श्रीमती पोर्णिमा चौघुले/श्रींगी, पोलीस उप आयुक्त सो. परीमंडळ-२ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त सो. तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली आचोळे पोलीस ठाणेचे श्री. बाळासाहेब पवार वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पोलीस उपनिरीक्षक बुधवंत लोंढे, पो.हवा. राहुल मुळे, प्रशांत सावदेकर, पो.अं. शरद उगलमुगले, सागर वाकचौरे सर्व नेमणुक आचोळे पोलीस ठाणे यांनी पार पाडली. सदर गुन्हाचा तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. विवेक सोनवणे करत आहेत.